# महाराष्ट्र शासन

सहसंचालक उच्च शिक्षण
१७ डॉ. आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे-४११००१
Website: www.jdhepune.org E-mail - jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्रमांक ०२०- २६०५१६३२

क्रमांक- ग्रीन क्लब प्रशिक्षण- २०२३ (        )/ दिनांक-३०/०८/२०२३

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२. प्राचार्य सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित / कायम विना अनुदानित महाविद्यालये, **पुणे शहर**

विषय : **ग्रीन क्लब फॅकल्टीकॉर्डिनेटर** (Green Club Faculty coordinator) **यांना एक दिवसीय प्रशिक्षणास पाठवणे बाबत...**

**संदर्भ:** १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मार्गदर्शक सूचना क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१२९/विशि-५ दि. १३ जानेवारी २०२३

२. महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचे पत्र क्र. उशिसं/युनिसेफ २०२३/७३२४ दि. २०.०६.२०२३

३. महाराष्ट्र शासन व युनिसेफ द्वारे राबवण्यात येत असलेल्या युवकांच्या (Youth) मार्फत नैसर्गिक संसाधनांचेसरंक्षण व पाण्याची बचत संयुक्त अभियानातीलमास्टरट्रेनर, ग्रीन क्लब आणि स्वयं-गती ऑनलाईनकोर्सबाबत स्पष्टीकरण पत्र क्र. उशिसं/२०२३/७३१५ दि. २०.०६.२०२३

उपरोक्त विषयास अनुसरून महाराष्ट्र शासन व युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन - युवकांच्या (youth) सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच पाण्याची बचत हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत राज्यातील १३ निवडक जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात (उच्च व तंत्र शिक्षण) शिकत असलेल्या युवक / युवतींची वातावरण, हवामान बदल आणि पाणी बचत याविषयी माहिती वृद्धिंगत करणे, कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षण घेणे, शैक्षणिक संस्था स्तरावर ग्रीन क्लबची स्थापना करणे, पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे, इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहेत.

संदर्भीय पत्रानुसार सदरील अभियानामध्ये आपल्या महाविद्यालयातून एका **ग्रीन क्लब फॅकल्टी कॉर्डिनेटर** (GCFC) यांची नियुक्ती केलेली माहिती आपण पत्राद्वारे कळवलेली आहे. नियुक्त केलेल्या **पुणे शहरातील - सर्व महाविद्यालयातील** ग्रिन क्लब फॅकल्टी कॉर्डिनेटर यांचे एक दिवसीय प्रशिक्षण **बुधवार दिनांक :- ०६ /०९/२०२३ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता मॉडर्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५** या ठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे. सर्व महाविद्यालयातील ग्रिन क्लब फॅकल्टी कॉर्डिनेटर यांनी सदर प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात. ग्रिन क्लब फॅकल्टी कॉर्डिनेटर हे आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी (Program officer) यांच्या व्यतिरिक्त असतील याची दक्षता घ्यावी.

तरी सदर प्रशिक्षणास आपल्या महाविद्यालयातील ग्रिन क्लब फॅकल्टी कॉर्डिनेटर यांना वेळेत उपस्थित राहण्याबाबत तात्काळ कळवण्यात यावे.

तसेच या संदर्भात दिनांक ०४.०९.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन बैठकीसाठी सर्व प्राचार्यांनी उप स्थि त रहावे. ऑनलाईन बैठकीची लिंक ग्रूपवर पाठविण्यात येईल.

(डॉ.किरणकुमार बोंदर)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभागीय कार्यालय, पुणे - 414001

**प्रशिक्षणाचे ठिकाण:** **नवीन इमारत, स्वरसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर सभागृह, मॉडर्न कला, वाणिज्य वविज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ बुधवार दिनांक ०६.०९.२०२३ सकाळी १०.०० वाजता.**